
# उद्योग(भाग ३) औद्योगिक प्रदूषण

T5_L4





धूर

तेलामुळे जमिनीचे प्रदूषण

# औद्योगिक प्रदूषण कशाला म्हणायचे?

T5_L4

“विविध उद्योगांमुळे,प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने परिसरातील प्राकृतिक व जैविक घटकांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनिष्ट बदल होणे म्हणजे ‘औद्योगिक प्रदूषण’ होय.”


# कारखान्यातून बाहेर पडणारे सांडपाणी आणि धूर





# औद्योगिक प्रदूषण कोणकोणत्या उद्योगांमुळे होते?

T5_L4_A1



# औद्योगिक प्रदूषणाचे प्रकार

T5_L4_A2

- वायू प्रदूषण
- जल प्रदूषण
- घन कचरा (भूमी प्रदूषण)
- ध्वनी प्रदूषण

# औद्योगिक प्रदूषणाची कारणे

T5_L4_A3

| कारण | प्रदूषण |
| --- | --- |
| उद्योगांमधून बाहेर पडणारे सांडपाणी | जल प्रदूषण |
| उद्योगांच्या धुराड्यातून बाहेर पडणारा धूर | हवा प्रदूषण |
| उद्योगांमध्ये तयार होणारा घन कचरा | भूमी प्रदूषण |
| उद्योगांच्या ठिकाणी होणारे यंत्रांचे,वाहनांचे मोठे आवाज | ध्वनी प्रदूषण |

# औद्योगिक प्रदुषणाचे मानवी आरोग्य व पर्यावरणावर होणार परिणाम

T5_L4_A4

उद्योगांमधून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे पर्यावरणात कार्बन डाय ऑक्साईड($CO_2$),सल्फर डाय ऑक्साईड($SO_2$)चे प्रमाण वाढल्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढण्यात हातभार लागतो आहे .शिवाय या धुरामुळे मानवाला श्वसनाचे आजार होत आहेत. रासायनिक पर्जन्य (Acid rain) अशा समस्या निर्माण होत आहेत.

उद्योगांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यामुळे पर्यावरणातील शुद्ध जलसाठे प्रदूषित होत आहेत. तसेच हे सांडपाणी नद्यांमध्ये सोडले जात असल्याने नद्यांना गटाराचे स्वरूप आले आहे.

कारखान्यांमधून बाहेर टाकला जाणारा घन कचरा पर्यावरणात शोषला जात नाही,कुजत नाही त्यामुळे अशा कचऱ्याचा भार आणि याची विल्हेवाट लावण्याची समस्या जगातील बहुतेक सर्व देशांपुढे निर्माण झाली आहे.

कारखान्यात होणारे यंत्रांचे आवाज ध्वनी प्रदूषण करतात.त्यामुळे तेथे काम करणाऱ्या कामगारांना बहिरेपणा येतो.

# प्रदूषके

T5_L5

“पर्यावरणातील ज्या घटकाच्या अस्तित्वामुळे पर्यावरणाची गुणवत्ता घसरते त्या घटकांना प्रदूषके असे म्हणतात.”

# उपक्रम

T5_L6

- विद्यार्थी मित्रांनो,तुम्ही तुमच्या आसपास अनेक प्रकारचे प्रदूषण पाहत असाल.उदा.तुमच्या परिसरातून राष्ट्रीय महामार्ग जात असेल तर ध्वनी आणि वायू प्रदूषण तुम्हाला आढळले असेल तर तुम्ही अशा प्रकारचे प्रदूषण कमी करण्यासाठी कोणते उपाय सुचवालं?
- काहींच्या घराजवळून नदी वाहत असेल परंतु तिची अवस्था गटारगंगेसारखी असेल तर नदीचे पात्र स्वच्छ राहण्यासाठी तुम्हाला कोणत्या गोष्टी सुचवाव्याशा वाटतात?
- उद्योग हे देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत हे तुम्ही कसे सिद्ध कराल?

# मूल्यमापन

T5_L7

- एका वाक्यात उत्तरे लिहा.

१)औदोगिक प्रदूषण म्हणजे काय?

२)प्रदूषणाचे प्रकार कोणते?

३)प्रदुषकाची व्याख्या लिहा.

४)जलप्रदूषणाचे तोटे लिहा.

# उत्तरे

T5_L7_A1

- १)विविध उद्योगांमुळे,प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीने परिसरातील प्राकृतिक व जैविक घटकांवर मोठ्या प्रमाणावर अनिष्ट बदल होणे म्हणजे 'औदोगिक प्रदूषण'होय.
- २)जलप्रदूषण,वायुप्रदूषण,ध्वनिप्रदूषण,भूमिप्रदूषण इत्यादी प्रदूषणाचे प्रकार आहेत.
- ३)"पर्यावरणातील ज्या घटकांच्या अस्तित्वामुळे पर्यावरणाची गुणवत्ता घसरते त्या घटकांना 'प्रदूषके'असे म्हणतात."
- ४)पाण्याचे प्रदूषण झाल्याने ते पिण्यायोग्य राहत नाही,त्यातील प्रदुषकांमुळे विविध रोग उदा.अतिसार,जुलाब,उलट्या,काविळ इत्यादी होतात.